News Paper Name:  Pudhari (Pune Edition)
Language: Marathi
Web Link: http://newspaper.pudhari.co.in/home.php?edition=My%20Pune&date=2017-03-24&pageno=3&pid=PUDHARI_PUN
Page Number : 3
Date:  24 March 2017



# विद्यापीठात दहशतवादावर आंतरराष्ट्रीय परिषद

**पुणे : प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण नॅशनल सेंटर ऑफ इंटरनॅशनल सिक्युरिटी ॲण्ड डिफेन्स ॲनालिसिस (वायसी- निसदा) तर्फे २३ व २४ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेचे उद्घाटन २३ मार्च रोजी सकाळी १० वाजता वायसी-निसदा ग्रंथालयाच्या सभागृहात होणार आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन अमेरिकेच्या पेनसिल्व्हिया स्टेट युनिव्हर्सिटीच्या स्कूल ऑफ इंटरनॅशनल अफेअर्सचे प्रा. स्कॉट सिग्मंड गार्टनर, नवी दिल्लीच्या आय.सी.एस.एस.आर.चे संचालक डॉ. उपेंद्र चौधरी यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी भारतीय वायुसेनेचे माजी उपप्रमुख एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती वायसी-निसदाचे संचालक प्रा. डॉ. विजय खरे यांनी दिली.

या आंतरराष्ट्रीय परिषदेत सरकारी तज्ज्ञ व सामरिक विश्लेषक श्रीनिवास सोहोनी, संरक्षण व सामरिकशास्त्राचे माजी विभागप्रमुख श्रीकांत परांजपे, मद्रास विद्यापीठाचे संरक्षण व सामरिक शास्त्राचे विभागप्रमुख प्रा. गोपाल मालविया, बडोदा विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. दिलीप मोहिते, चंदिगड विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिक शास्त्र विभागाचे प्रा. राकेश दत्ता, लेफ्टनंट जनरल डी. बी. शेकटकर, कोलकाताच्या जाधवपूर विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय संबंध विभागाचे प्रा. त्रिदीप चक्रवर्ती, हैदराबादचे राष्ट्रीय सुरक्षा विश्लेषक व माध्यम प्रशिक्षक नितीन गोखले, अलाहाबाद केंद्रीय विद्यापीठाच्या संरक्षण व सामरिक शास्त्र विभागाचे डॉ. संजीव भदुरिया, पुण्याच्या एम.आय.टी. स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे संचालक प्रा. परिमल माया सुधाकर, मुंबई विद्यापीठाच्या फिरोजशाह मेहता भवन व संशोधन केंद्राच्या राज्यशास्त्र व समाजशास्त्र विभागाचे सहयोगी प्रा. डॉ. एल. ए. खान, प्रा. डॉ. विजय खरे, डॉ. अरुण दळवी, डॉ. सुषमा भोसले, प्रा. अरुण विश्वनाथन आपले शोधनिबंध सादर करणार आहेत.